# फिरकीपुढे इंग्लंडची शरणागती

## विंडीजचा ३० धावांनी विजय; रूदरफोर्डची आक्रमक खेळी

**संदीप कदम, लोकसत्ता**

**मुंबई :** शेरफेन रूदरफोर्डच्या (४२ चेंडूंत नाबाद ७६ धावा) आक्रमक अर्धशतकानंतर गुडाकेश मोती (३३ धावांत ३ बळी), रॉस्टन चेस (२९ धावांत २ बळी) आणि अकील हुसेन (३२ धावांत १ बळी) यांच्या प्रभावी फिरकी माऱ्याच्या जोरावर वेस्ट इंडिजने ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेतील 'क' गटाच्या सामन्यात बुधवारी इंग्लंडवर ३० धावांनी विजय मिळवला. या विजयानंतर गटात चार गुणांसह विंडीज अग्रस्थानी पोहोचला आहे. इंग्लंडला पुढची फेरी गाठायची झाल्यास उर्वरित सामन्यांमध्ये चांगल्या निव्वळ धावगतीसह विजय मिळवणे बंधनकारक असेल.

मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात विंडीजने २० षटकांत ६ बाद १९६ धावांची मजल मारली. याचा पाठलाग करताना इंग्लंडचा डाव १९ षटकांत १६६ धावांत आटोपला. इंग्लंडने सुरुवात आक्रमक केली. पहिल्या षटकात सात धावा काढल्यानंतर जेसन होल्डरच्या दुसऱ्या षटकात २४ धावा करत इंग्लंडने दोन षटकांत बिनबाद ३१ धावा केल्या. यानंतर फिल सॉल्टला (३०) शेफर्डने बाद करत इंग्लंडला पहिला धक्का दिला. जोस बटलर (२१), जेकब बेथल (३३) आणि टॉम बँटन (२) ठरावीक अंतराने बाद झाल्यामुळे इंग्लंडची ४ बाद ९० अशी स्थिती झाली होती. यानंतर कर्णधार हॅरी ब्रूक (१७) व सॅम करन (नाबाद ४३) यांनी संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. मात्र, ब्रूकला मोतीने बाद करत इंग्लंडला पुन्हा अडचणीत टाकले. इंग्लंडला अखेरच्या चार षटकांत ५६ धावांची आवश्यकता होती. मात्र, तळाच्या फलंदाजांना फार काही करता न आल्याने इंग्लंडचा संघ विजयापासून बराच दूर राहिला.

त्यापूर्वी, प्रथम फलंदाजी करणाऱ्या वेस्ट इंडिज संघाची सुरुवात चांगली झाली नाही. कर्णधार शाय होप (०) आणि ब्रेंडन किंग (१) लवकर माघारी परतल्याने विंडीजची २ बाद ८ अशी स्थिती झाली. यानंतर शिमरॉन हेटमायर (२३) आणि रॉस्टन चेस (३४) यांनी काही काळ टिकून खेळताना संघाचा डाव सावरला. मात्र, त्यांनाही मोठी खेळी करता न आल्याने विंडीजचा संघ ४ बाद ७७ असा अडचणीत सापडला. मग, रूदरफोर्ड आणि रोव्हमन पॉवेल (१४) यांनी भागीदारी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात पॉवेल बाद झाला. यानंतर मैदानात आलेल्या जेसन होल्डरने (१७ चेंडूंत ३३) रूदरफोर्डला चांगली साथ दिली. सहाव्या गड्यासाठी त्यांनी ३२ चेंडूंत ६१ धावांची भागीदारी रचत विंडीजला मोठ्या धावसंख्या करून दिली. रूदरफोर्डने नाबाद खेळी करताना दोन चौकार व सात षटकार लगावले. होल्डरने एक चौकार व चार षटकार मारले.

### संक्षिप्त धावफलक

**वेस्ट इंडिज :** २० षटकांत ६ बाद १९६ (शेरफेन रूदरफोर्ड नाबाद ७६, रॉस्टन चेस ३४, जेसन होल्डर ३३; आदिल रशीद २/१६, जेमी ओव्हर्टन २/३३)

**विजयी वि. इंग्लंड :** १९ षटकांत सर्वबाद १६६ (सॅम करन नाबाद ४३, जेकब बेथल ३३, फिल सॉल्ट ३०; गुडाकेश मोती ३/३३, रॉस्टन चेस २/२९, अकील हुसेन १/३२)



छाया : नरेंद्र वास्कर

### वानखेडेवर २१ हजारहून अधिक चाहते

भारताचा संघ खेळत नसूनही मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर सामना पाहण्यासाठी चाहत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. इंग्लंड-विंडीज सामन्याकरिता २१ हजारहून अधिक चाहते उपस्थित होते.

# भारतात न खेळण्याचा निर्णय खेळाडूंचा!

## बांगलादेश क्रीडा सल्लागार आसिफ नझरूल यांचे घूमजाव

**वृत्तसंस्था, ढाका**



**सरकारला खेळाडूंच्या** सुरक्षेची चिंता वाटत असल्यामुळे ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेसाठी बांगलादेश संघाला भारतात पाठविण्यास नकार देण्यास आग्रह धरणारे बांगलादेशचे क्रीडा सल्लागार आसिफ नझरूल यांनी आता विधानावरून घूमजाव केले असून, राष्ट्रीय प्रतिष्ठेचे रक्षण करण्यासाठी खेळाडू आणि बांगलादेश क्रिकेट मंडळानेच (बीसीबी) हा निर्णय घेतल्याचे बुधवारी सांगितले.

बांगलादेशचे सामने श्रीलंकेत हलविण्याचा हट्ट कायम राहिल्यानंतर 'आयसीसी'ने अखेरीस त्यांची विश्वचषक स्पर्धेतून हकालपट्टी केली आणि स्कॉटलंडला संधी दिली. अर्थात, यासाठी बांगलादेशला कोणत्याही प्रकारचा दंड न करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

बांगलादेश संघाच्या हकालपट्टीपूर्वी 'आयसीसी'बरोबर झालेल्या वाटाघाटीत नझरूल यांनी सुरक्षेच्या कारणामुळे बांगलादेश संघ भारतात जाणार नसल्याचे म्हटले होते. मात्र, 'आयसीसी'ने सामने भारताबाहेर हलविण्यास स्पष्ट नकार दिला. परंतु आता ट्वेन्टी-२० विश्वचषल स्पर्धेत न खेळण्याचा निर्णय मी नाही, तर खेळाडू आणि 'बीसीबी'ने घेतल्याचे घुमजाव नझरूल यांनी केले आहे.

''विश्वचषक स्पर्धा न खेळण्याचा पश्चात्ताप होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. 'बीसीबी' आणि खेळाडूंचा हा निर्णय होता. त्यांनी राष्ट्रीय प्रतिष्ठेचे रक्षण करण्यासाठी त्याग केला,'' असे नझरूल यांनी म्हटले आहे.

बांगलादेशच्या समर्थनार्थ भारताविरुद्धचा सामना न खेळण्याच्या पाकिस्तान क्रिकेट मंडळाने (पीसीबी) घेतलेल्या भूमिकेचे आणि पुढे जाऊन खेळाच्या व्यापक हितासाठी सामन्यावरील बहिष्कार मागे घेण्यास पाकिस्तानचे मन वळविण्यात प्रमुख भूमिका घेणाऱ्या 'बीसीबी'चे देखील नझरूल यांनी कौतुक केले.

## हॉकीत बेल्जियमची भारतावर मात

**राऊरकेला :** अखेरच्या टप्प्यात खेळ खालावण्याचे भारताचे जुने दुखणे हॉकी प्रो लीगच्या नव्या हंगामातील पहिल्या सामन्यातही कायम राहिले. बेल्जियमने बुधवारी झालेल्या सामन्यात अखेरच्या चार मिनिटांत दोन गोल करून भारताचा ३-१ असा पराभव केला. भारताचा दुसरा सामना आज अर्जेंटिनाशी होईल. नेल्सन ओनाना (२३व्या मिनिटाला), थॉमस क्रोल्स (५३व्या मि.), अर्नो व्हॅन डेसेल (५७व्या मि.) यांनी बेल्जियमसाठी गोल केले. भारताचा एकमेव गोल शिलानंद लाक्राने २९व्या मिनिटाला केला.

## आशियाई नेमबाजीत अनिशला कांस्य



**नवी दिल्ली :** जागतिक स्पर्धेतील रौप्यपदक विजेता नेमबाज अनिश भानवाला याला आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत बुधवारी पुरुषांच्या २५ मीटर रॅपिड फायर प्रकारात कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. स्पर्धेच्या आठव्या दिवशी कझाकस्तानने चार सुवर्णपदके मिळवले.

कुमार गटात ५० मीटर रायफल प्रोन प्रकारात आद्रियन कर्माकर आणि २५ मीटर रॅपिड फायर पिस्तूल प्रकारात भारताने सांघिक सुवर्णपदक मिळवले. भारताची पदकसंख्या आता ४१ सुवर्ण, १९ रौप्य आणि १५ कांस्य अशी झाली आहे.

अनिश आणि आदर्श सिंह अनुक्रमे ५७४ आणि ५७३ गुणांसह सातव्या आणि आठव्या क्रमांकाने पदक फेरीत दाखल झाले होते. अंतिम फेरीत आदर्श चौथ्या मालिकेनंतरच बाहेर पडला, तर अनिश सहाव्या मालिकेनंतर योशियोका, निकितासह संयुक्त आघाडीवर होता. सातव्या मालिकेतील अपयशाने अनिशला कांस्यवर समाधान मानावे लागले.

कुमार गटात सूरज शर्मा, मुकेश नेलावल्ली रॅपिड फायर प्रकारात रौप्य आणि कांस्यपदकाचे मानकरी ठरले. या दोघांनी साहिल चौधरीसह भारताला सांघिक सुवर्णपदक मिळवून दिले. रायफल प्रोन प्रकारात भारताच्या कर्माकरने ६२१.७ गुणांसह सुवर्णपदक जिंकले.

# भारताविरुद्धचा सामना 'सामान्यच'!

## पाकिस्तानचा फलंदाज साहिबझादाचे वक्तव्य

**पीटीआय, कोलंबो**

**भारताविरुद्धचा सामना** हा आमच्यासाठी केवळ एक 'सामान्य' सामना आहे आणि आमच्यावर कोणतेही अतिरिक्त दडपण नाही, असे वक्तव्य पाकिस्तानचा फलंदाज साहिबझादा फरहान याने केले. ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान हे पारंपरिक प्रतिस्पर्धी येत्या रविवारी आमनेसामने येणार आहेत.

नेदरलँड्स आणि अमेरिकेविरुद्ध विजय मिळवत पाकिस्तान 'अ' गटात अव्वल स्थानावर आहे. अमेरिकेविरुद्ध साहिबझादाने ४१ चेंडूत ७३ धावांची खेळी करत सामनावीराचा पुरस्कार पटकावला. सामन्यानंतरच्या पत्रकार परिषदेत साहिबझादाला भारताविरुद्धच्या लढतीबाबत विचारण्यात आले. ''दोन सामने जिंकून आम्ही गुणतालिकेत अव्वल आहोत. त्यामुळे आमचा आत्मविश्वास निश्चितपणे वाढला आहे. पुढचा सामना आमच्यासाठी काही वेगळा नाही. त्यांच्याविरुद्ध खेळण्याची ही आमची पहिली वेळ नसेल,'' असे साहिबझादा म्हणाला.

''हा एक सामान्य सामना आहे. आम्ही तो तसाच खेळू. भारत-पाकिस्तान सामना आहे, असे मनावर घेणार नाही. यावेळी आमचा दृष्टिकोन वेगळा असेल. आमचे फलंदाज लयीत आहेत. शादाब खान आणि मोहम्मद नवाझ हेसुद्धा अखेरच्या षटकांत धावा करत आहेत. आमचा खेळ तुम्हाला आवडेल अशी आशा आहे,'' असेही त्याने सांगितले.

गेल्या वर्षी आशिया चषकात भारत आणि पाकिस्तान हे संघ तीन वेळा समोरासमोर आले. प्रत्येक वेळी भारतीय संघच विजयी ठरला, ज्यात अंतिम सामन्याचाही समावेश होता. त्यामुळे आता दोन संघांत मोठी तफावत असल्याचे भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादव याने म्हटले होते. मात्र, साहिबझादा त्या मताशी सहमत नाही. ''गेल्या आशिया चषकात एकही सामना एकतर्फी झाला नाही. आम्ही शेवटपर्यंत झुंज दिली होती. यावेळीही आम्ही उत्कृष्ट खेळ करू,'' असा विश्वास त्याने व्यक्त केला.



हा एक सामान्य सामना आहे. आम्ही तो तसाच खेळू. भारत-पाकिस्तान सामना आहे असे मनावर घेणार नाही.
**– साहिबझादा फरहान**


**बँक ऑफ इंडिया Bank of India BOI**
**प्रधान कार्यालय**
**व्यवहार निरीक्षण व केवायसी / एएमएल विभाग**
**शुद्धिपत्र**

बँक ऑफ इंडिया आपल्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांसाठी अभिप्राय (फीडबॅक) प्रक्रिया राबविण्यासाठी खुली निविदा आमंत्रित करत आहे. या संदर्भात निविदा आमंत्रण प्रस्ताव (आरएफपी) दिनांक 21.01.2026 रोजी जारी करून बँकेच्या अधिकृत संकेतस्थळावर अपलोड करण्यात आला आहे. निविदा सादर करण्याची अंतिम मुदत 10.02.2026 रोजी सायं. 5.00 वाजेपर्यंत होती. ती आता वाढवून 21.02.2026 पर्यंत करण्यात आली आहे. निविदा उघडण्याची तारीख 24.02.2026 अशी निश्चित करण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी कृपया बँक ऑफ इंडियाच्या अधिकृत संकेतस्थळाला : **www.bankofindia.bank.in** भेट द्या **BOI>Important Links>Tender**

**महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई**
(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)
१४ए/१४बी, पहिला मजला, मित्तल चेंबर्स, २२८, नरीमन पॉईंट, मुंबई – ४०००२१

**विनंती प्रस्ताव (आरएफपी)**

म.फु.मा.वि.म.मर्या. इच्छूक संस्थांकडून महाराष्ट्रातील निवडक महानगरपालिकांमध्ये वापर करण्यासाठी **''मल्टी–ब्लेड सिस्टम, रोटेटिंग बूम आणि बकेट सिस्टमसह १०० नग मॅनहोल क्लीनिंग रोबोट्सचा पुरवठा, स्थापना आणि कार्यान्वयन करण्याकरिता विनंती प्रस्ताव (RFP)''** याकरिता अर्ज मागवत आहे. अर्जदार **https://mahatenders.gov.in** येथून आरएफपी दस्तऐवज डाउनलोड करू शकतील तसेच अधिक माहितीकरिता **https://mpbcdc.maharashtra.gov.in** येथे जावे.

**अर्ज करण्याचे दिनांक :** १२ फेब्रुवारी २०२६ ते ०६ मार्च २०२६ सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत.

**आदेशानुसार**
**व्यवस्थापकीय संचालक, मफुमाविमम**

**Honeywell**
**हनीवेल ऑटोमेशन इंडिया लिमिटेड**
सीआयएन : एल२९२९९पीएन१९८४पीएलसी०१७९५१
**नोंद. कार्यालय :** ५६ आणि ५७ हडपसर इंडस्ट्रीयल इस्टेट, पुणे ४११०१३
दूरध्वनी : +९१ २० ७११४ ८८८८, ई–मेल : HAIL.investorservices@honeywell.com
संकेतस्थळ : https://www.honeywell.com/in/en/hail

**प्रत्यक्ष भागांची हस्तांतरण विनंती पुन्हा करण्यासाठी विशेष खिडकी**

हनीवेल ऑटोमेशन इंडिया लिमिटेड (''कंपनी'')च्या प्रत्यक्ष भागांच्या हस्तांतरण विनंत्या १ एप्रिल २०१९ पूर्वी दाखल करण्यात आल्या होत्या आणि कागदपत्रांमध्ये/ प्रक्रियेत/ किंवा इतर कारणांमुळे विविधता वाटल्यामुळे त्या नाकारण्यात आल्या/ परत करण्यात आल्या/ हाताळण्यात आल्या नाहीत.

सेबी परिपत्रक क्रमांक SEBI/HO/MIRSO/MIRSO-PoO/P/CIR/2025/97 दिनांकित २ जुलै, २०२५ अनुसार, अशा हस्तांतरण विनंत्या पुन्हा दाखल करण्यासाठी कंपनीने ७ जुलै २०२५ ते ६ जानेवारी २०२६ पर्यंत एक विशेष विंडो उघडली होती.

सेबीच्या परिपत्रक क्रमांक H0/38/13/11(2)2026-MRISD-POD/1/3750/2026 दिनांक ३० जानेवारी २०२६ नुसार, या हस्तांतरण विनंत्या पुन्हा दाखल करण्यासाठी कंपनीने ५ फेब्रुवारी, २०२६ ते ४ फेब्रुवारी, २०२७ पर्यंत आणखी एक विशेष विंडो उघडली आहे.

सदर कालावधीत, हस्तांतरणासाठी पुन्हा दाखल केलेल्या सिक्युरिटीज केवळ डीमॅट पद्धतीने जारी केल्या जातील जर हस्तांतरण-सह-डीमॅट विनंत्या आणि वैध हस्तांतरणासाठी सेबीने विहित केलेल्या आवश्यकतांचे पालन केले असेल.

संबंधित भागधारकांनी, त्यानुसार, हस्तांतरण करार पुन्हा दाखल करावेत आणि आवश्यक कागदपत्रे, सर्व बाबतीत योग्यरित्या पूर्ण करून, कंपनीच्या रजिस्ट्रार आणि हस्तांतरण एजंटः एमयूएफजी इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, सी १०१, २४७ पार्क, लाल बहादूर शास्त्री मार्ग, विक्रोळी पश्चिम, मुंबई ४०००८३ येथे सादर करावीत. दूरध्वनीः + ९१–८१०८११८४८४. ईमेलः investor.helpdesk@in.mpms.mufg.com. संकेतस्थळः www.in.mpms.mufg.com.

**हनीवेल ऑटोमेशन इंडिया लिमिटेडकरिता**
**इंदू दर्यानी,**
कंपनी सचिव

ठिकाण : पुणे
दिनांक : फेब्रुवारी ११, २०२६

JUNIPER HOTELS
**ज्युनिपर हॉटेल्स लिमिटेड**
**(पूर्वीची ज्युनिपर हॉटेल्स प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ज्ञात)**
**सीआयएन :** L55101MH1985PLC152863
**नोंदणीकृत कार्यालय :** ऑफ वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई – ४०० ०५५.
**ई–मेल :** complianceofficer@juniperhotels.com; **वेबसाइट :** www.juniperhotels.com

**दि. ३१.१२.२०२५ रोजी संपलेली तिमाही व नऊमाहीकरिताच्या अलेखापरीक्षित स्थायी व एकत्रित वित्तीय निष्कर्षांचा सारांश**

(रु. लाखांत, वेगळे उल्लेखित केलेले नसल्यास)

| तपशील | स्थायी | | | | | | एकत्रित | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | तिमाहीअखेर | | | नऊमाहीअखेर | | वर्षअखेर | तिमाहीअखेर | | | नऊमाहीअखेर | | वर्षअखेर |
| | ३१.१२.२०२५ | ३०.०९.२०२५ | ३१.१२.२०२४ | ३१.१२.२०२५ | ३१.१२.२०२४ | ३१.०३.२०२५ | ३१.१२.२०२५ | ३०.०९.२०२५ | ३१.१२.२०२४ | ३१.१२.२०२५ | ३१.१२.२०२४ | ३१.०३.२०२५ |
| | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (लेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (लेखापरीक्षित) |
| एकूण उत्पन्न | २६,४४१.४० | २०,७८१.२२ | २२,६८०.८३ | ६७,०४३.०७ | ६०,०४०.५२ | ८५,५६६.३५ | २९,९९९.७० | २३,५०२.२९ | २६,०९८.३१ | ७६,२२७.०५ | ६८,८६६.१५ | ९७,५६१.१९ |
| अपवादात्मक बाबी व करपूर्व नफा | ७,९७३.२९ | ३,११४.१८ | ४,०५९.३१ | १४,८१६.४९ | ८,१२५.५० | १५,४१९.३६ | ८,२५३.२१ | २,७५१.९६ | ४,३५१.६० | १४,५०५.३१ | ७,६५३.४७ | १४,९९८.९३ |
| अपवादात्मक बाबी | (१२८.४६) | – | – | १,५८५.७२ | – | – | (९६.६०) | ३७८.५६ | – | १,९९६.१४ | – | – |
| करपूर्व नफा | ८,१०१.७५ | ३,११४.१८ | ४,०५९.३१ | १३,२३०.७७ | ८,१२५.५० | १५,४१९.३६ | ८,३४९.८१ | २,३७३.४० | ४,३५१.६० | १२,५०९.१७ | ७,६५३.४७ | १४,९९८.९३ |
| कालावधीकरिता नफा /तोटा | ६,२३९.५० | २,३२९.७५ | ३,०३४.०० | ९,६४५.५७ | २,५७०.७६ | ८,०२७.६६ | ६,५४२.३२ | १,६८१.०३ | ३,२४९.२९ | ९,१२३.५३ | १,६३३.४५ | ७,१२८.८५ |
| कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न, निव्वळ कर | ६,२८१.६२ | २,२८१.३६ | ३,०४५.५१ | ९,५६९.७४ | २,६१२.०४ | ८,०४६.९१ | ६,५७३.८२ | १,६३५.६० | ३,२५७.३८ | ९,०३७.६१ | १,६७१.४३ | ७,१४१.७५ |
| प्रदानित समभाग भांडवल (दर्शनी मूल्य प्रतिशेअर रु. १०/–) | २२,२५०.२४ | २२,२५०.२४ | २२,२५०.२४ | २२,२५०.२४ | २२,२५०.२४ | २२,२५०.२४ | २२,२५०.२४ | २२,२५०.२४ | २२,२५०.२४ | २२,२५०.२४ | २२,२५०.२४ | २२,२५०.२४ |
| अन्य समभाग | | | | | | २,४७,६२९.५२ | | | | | | २,५०,४१९.६४ |
| पेरेंट इक्विटी होल्डर्सना समर्पित रु. १०.०० दर्शनी मूल्याच्या प्रतिशेअरकरिता उत्पन्न/(तोटा) मूलभूत व सौम्यीकृत *अवार्षिकीकृत | २.८१* | १.०५* | १.३६* | ४.३४* | १.१६* | ३.६१* | २.९४* | ०.७६* | १.४६* | ४.१०* | ०.७३* | ३.२०* |

**वित्तीय निष्कर्षांच्या टीपा**

१. वरील माहिती भारतीय सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्कलोजर रिक्वायरमेंट्स), २०१५ च्या सुधारित नियम ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजकडे दाखल केलेल्या अलेखापरीक्षित आर्थिक निकालांच्या तपशीलवार स्वरूपाचा उतारा आहे (लिस्टिंग रेग्युलेशन्स) अलेखापरीक्षित केलेल्या आर्थिक निकालांचे संपूर्ण स्वरूप स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइट www.nseindia.com आणि www.bseindia.com आणि कंपनीच्या वेबसाइट www.juniperhotels.com वर उपलब्ध आहे.

**ज्युनिपर हॉटेल्स लिमिटेडच्या**
**संचालक मंडळाकरिता व त्यांच्या वतीने**
**सही/–**
**अरुण कुमार सराफ**
**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**
**डीआयएन : ००३३९७७२**

**ठिकाण :** मुंबई
**दिनांक :** ११.०२.२०२६

GLOBAL EDUCATION LTD. Always A Step Ahead
**ग्लोबल एज्युकेशन लिमिटेड**
**CIN - L80301MH2011PLC219291**
नोंदणीकृत कार्यालय : 205, दुसरा मजला जयसिंग बिझनेस सेंटर परिसर सीएचएसएल, सहार रोड,ब्लॉक सेक्टर पारसीवाडा, अंधेरी (ई), मुंबई –400099, महाराष्ट्र, भारत. ई–मेल : investorinfo@globaledu.net.in फोन नं. : 0712-6649395
फॅक्स नं. : 0712-6649396 वेबसाईट : www.globaledu.net.in

**31 डिसेंबर 2025 रोजी संपलेल्या तिमाही समाप्तिचा अलेखापरीक्षित परिणामांचा संक्षिप्त गोषवारा**

(रूपये लाखात EPS वगळता)

| अ. क्रं. | तपशील | स्वतंत्र | | | | | | एकत्रित | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तिमाही समाप्ति | | | नऊमाही समाप्ति | | वर्ष समाप्ति | नऊमाही समाप्ति | | | सहामाही समाप्ति | | वर्ष समाप्ति |
| | | 31-12-2025 | 30-09-2025 | 31-12-2024 | 31-12-2025 | 31-12-2024 | 31-03-2025 | 31-12-2025 | 30-09-2025 | 31-12-2024 | 31-12-2025 | 31-12-2024 | 31-03-2025 |
| | | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (लेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (लेखापरीक्षित) |
| 1. | प्रवर्तनातुन एकुण उत्पन्न | 2739.02 | 2672.11 | 1664.66 | 6903.11 | 5572.31 | 7143.58 | 2917.07 | 2783.69 | 1736.94 | 7226.98 | 5825.02 | 7541.44 |
| 2. | कालावधीसाठी (करपुर्व, अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबीपूर्वी निव्वळ नफा/तोटा) | 790.59 | 908.77 | 642.30 | 2286.00 | 2801.59 | 3395.24 | 894.39 | 998.11 | 813.61 | 2452.60 | 3125.87 | 3697.33 |
| 3. | कालावधीसाठी करपूर्व (अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबीनंतर निव्वळ नफा/तोटा) | 790.59 | 908.77 | 642.30 | 2286.00 | 2801.59 | 3395.24 | 894.39 | 998.11 | 813.61 | 2452.60 | 3125.87 | 3697.33 |
| 4. | कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा तोटा (अपवादात्मक आणि / किंवा अनन्यसाधारण बाबीनंतर) | 600.38 | 657.18 | 441.61 | 1695.97 | 2073.41 | 2520.50 | 668.14 | 738.18 | 605.71 | 1828.06 | 2381.66 | 2808.67 |
| 5. | कालावधीसाठी एकुण व्यापक उत्पन्न [कालावधीसाठीचा नफा / तोटा) समाविष्ट करून (करोत्तर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करोत्तर)] | 600.38 | 657.18 | 441.61 | 1695.97 | 2073.41 | 2519.43 | 668.14 | 738.18 | 605.71 | 1828.06 | 2381.66 | 2807.60 |
| 6. | भरणा केलेले समभाग भांडवल (दर्शनी मुल्य रू.2/- प्रति समभाग) | 1018.03 | 1018.03 | 1018.03 | 1018.03 | 1018.03 | 1018.03 | 1018.03 | 1018.03 | 1018.03 | 1018.03 | 1018.03 | 1018.03 |
| 7. | भरणा केलेल्या समभागा प्रति प्राप्ती (प्रत्येकी रू. 2/- च्या) अखंडित आणि खंडित प्रवर्तनासाठी (समभाग प्रति प्राप्तीचे वार्षिकीकरण केलेले नाही.) | 1.18 | 1.29 | 0.87 | 3.33 | 4.07 | 4.95 | 1.31 | 1.45 | 1.20 | 3.59 | 4.70 | 5.54 |
| 8. | भरणा केलेल्या समभागा प्रति प्राप्ती (प्रत्येकी रू. 2/- च्या) समायोजीत आणि मुलभुत प्रवर्तनासाठी (समभाग प्रति प्राप्तीचे वार्षिकीकरण केलेले नाही.) | 1.18 | 1.29 | 0.87 | 3.33 | 4.07 | 4.95 | 1.31 | 1.45 | 1.20 | 3.59 | 4.70 | 5.54 |

**नोट :**
**अ)** वरील निर्देशित विवरण हे भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन 2015 च्या विनियमन 33 अंतर्गत स्टॉक एक्सचेंजेसकडे दाखल करण्यात आलेल्या दि. 31 डिसेंबर 2025 रोजी संपलेल्या तिमाही व सहामाही (स्वतंत्र व एकत्रित) निष्कर्षांच्या विस्तृत प्रारूपाचा सारांश आहे. 31 डिसेंबर 2025 रोजी संपलेली तिमाही वर्षाकरिताच्या स्थायी अलेखापरीक्षित वित्तीय (स्वतंत्र व एकत्रित) निष्कर्षांचे संपूर्ण प्रारूप नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडची वेबसाइट www.nseindia.com वर उपलब्ध आहे तसेच ती कंपनीची वेबसाइट (www.globaledu.net) वर उपलब्ध आहेत.
**ब)** वरील वित्तीय निष्कर्षांचे लेखापरीक्षण समितीद्वारे पुनरावलोकन करण्यात आले असून कंपनीच्या संचालक मंडळाद्वारे त्यांच्या दि. बुधवार 11 फेब्रुवारी 2026 रोजी आयोजित सभेमध्ये त्यांना मंजुरी देण्यात आली आहे.

**संचालक मंडळाच्या आदेशानुसार**
**ग्लोबल एज्युकेशन लिमिटेड करिता**
**सही/-**
**आदित्य भंडारी, पुर्ण कालीन संचालक**
**(DIN : 07637316)**

**ठिकाण :** नागपुर
**दिनांक :** 11/02/2026

**नवीन फ्लोरिन इंटरनॅशनल लिमिटेड**
नोंदणी कार्यालयः ऑफिस नं. ६०२, रुस्तमजी–नटराज, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे जवळ, सर मथुरदास वासनजी रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००६९, भारत
वेबसाईट : www.nfil.in। ई मेल : investor.relations@nfil.in
टेल नं.: ०२२– ६६५० ९९९९। फॅक्स नं. ०२२– ६६५० ९८००
सीआयएन क्र. L24110MH1998PLC115499
Responsible Care® OUR COMMITMENT TO SUSTAINABILITY

**सूचना**
**भौतिक शेअर्सचे हस्तांतरण आणि अमूर्तता(डीमॅट) पुर्नसादर करण्यासाठी विशेष खिडकी**

कृपया याची नोंद घ्यावी की, दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजीच्या सेबी परिपत्रक क्रमांक एचओ/३८/१३/११ (२) २०२६–एमआयआरएसडी–पीओडी/१/३७५०/२०२६ **("सेबी परिपत्रक")** नुसार **भौतिक शेअर्सच्या हस्तांतरण आणि डीमटेरियलायझेशन (डिमॅट)** साठी एक विशेष खिडकी दिनांक ०४ फेब्रुवारी २०२७ पर्यंत खुली राहील याची कृपया नोंद घ्यावी.

ज्या गुंतवणुकदारांनी **दिनांक १ एप्रिल २०१९ पूर्वी नवीन फ्लोरिन इंटरनॅशनल लिमिटेड ("कंपनी") चे भौतिक शेअर्स खरेदी** केले होते आणि (अ)हस्तांतरणासाठी शेअर्स दाखल केले नव्हते. किंवा (ब)हस्तांतरणासाठी शेअर्स दाखल केले होते परंतु दस्तऐवजातील कमतरतेमुळे रद्द करण्यात आले होते/ परत करण्यात आले होते/ किंवा दुर्लक्षित करण्यात आले होते, अशा गुंतवणूकदारांसाठी ही सुविधा उपलब्ध आहे.

**कृपया मूळ शेअर प्प्रमाणपत्रांसह हस्तांतरण करार आणि इतर सहाय्यक कागदपत्रे असलेल्या विनंतीअर्जांचाच विचार चिशेष खिडकी अंतर्गत केला जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.**

या विशेष खिडकीचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या गुंतवणूकदारांनी कंपनीचे **निबंधक आणि हस्तांतरण एजंट, केफिन टेक्नोलॉजीस लिमिटेड**, युनिटः नवीन फ्लोरीन इंटरनॅशनल लिमिटेड, सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१–३२, गाचीबोवली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, हैदराबाद ५०००३२ यांच्याशी संपर्क साधावा.

अधिक माहितीसाठी, गुंतवणुकदारांना https://www.sebi.gov.in/legal/circulars/jan-2026/ease-of-doing-investment-special-window-for-transfer-and-dematerialisation-of-physical-securities_99411.html येथे उपलब्ध सेबी परिपत्रक पाहता येईल.

**नवीन फ्लोरिन इंटरनॅशनल लिमिटेड करिता**
सही/–
निरज बी. मंकड
**अध्यक्ष कायदेशीर आणि कंपनी सचिव**
**एसीएस ९७२७**

दिनांक : फेब्रुवारी ११, २०२६
ठिकाण : मुंबई

PADMANABH MAFATLAL GROUP
Creating value. Sharing value.

